महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

**क्रमांक : १४७७[२]/२०२१/वीस** **दिनांक : २३ जून, २०२३**

# -: प्रसिध्दीपत्रक :-

**विषय** :- राज्य सेवा (मुख्य) परीक्षा-२०२१, गुणांच्या फेरपडताळणीबाबत (Retotalling) करीता अर्ज सादर करण्याबाबत.

**संदर्भ** :- जाहिरात क्रमांक ३१/२०२२ व अधिसूचना क्र. एनओटी-३६१७/सीआर-२४/२०२०/जाहिरात

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्यात आलेल्या राज्य सेवा (मुख्य) परीक्षा- २०२१ चा अंतिम निकाल १५ जून, २०२३ रोजी जाहीर करण्यात आला आहे.

**२.** प्रस्तुत निकालाद्वारे शिफारसपात्र ठरलेल्या व शिफारसपात्र न ठरलेल्या उमेदवारांना त्यांचे गुण आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील 'ONLINE FACILITIES' मधील 'View Marksheet' या वेबलिंकद्वारे उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. तसेच, गुणांची फेरपडताळणी (Retotalling) करु इच्छिणा-या उमेदवारांना फेरपडताळणीकरीता अर्ज सादर करण्यासाठी वेबलिंक उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सदर वेबलिंकद्वारे विहित शुल्कासह अर्ज सादर करण्याकरीता पुढीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे:-

(१) आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील 'ONLINE FACILITIES' मधील Retotalling of Marks या लिंकवर क्लिक करावे.

(२) उपलब्ध होणा-या परीक्षांच्या यादीमधून संबंधित परीक्षेची निवड करावी.

(३) परीक्षेच्या अर्जात नमूद मोबाईल क्रमांक नमूद करुन सदर क्रमांकावर प्राप्त होणारा ओटीपी प्रविष्ट करुन लॉगीन करावे.

(४) Retotallingसंदर्भातील लिंकवर क्लिक करावे.

(५) उपलब्ध होणा-या गुणपत्रकातील फेरपडताळणी करावयाची असलेल्या एक किंवा जास्त विषयाची निवड करुन 'Save'बटनवर क्लिक करावे.

(६) निवड केलेल्या विषयानुसार सेवा शुल्कासह विहित शुल्क ऑनलाईन पध्दतीने अदा करावे.

**३.** गुणांच्या फेरपडताळणीकरीताची सदर वेबलिंक दिनांक ३ जुलै, २०२३ रोजी २३:५९ वाजेपर्यंत सुरु राहील.

**४.**उपरोक्त कार्यपध्दतीनुसार गुणांच्या फेरपडताळणीकरीता अर्ज करताना कोणत्याही प्रकारची तांत्रिक अडचण उदभवल्यास आयोगाच्या १८००-१२३४-२७५ किंवा ७३०३८२१८२२ या टोल-फ्री क्रमांकावर अथवा Support-online@mpsc.gov.in या ई-मेल आयडीवर विहित कालावधीत संपर्क साधता येईल.

ठिकाण :- नवी मुंबई

उपसचिव
(परीक्षोत्तर राजपत्रित परीक्षा)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.